नोंदणी क्र. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

| वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ३२० Issue - 320 | वार शनिवार दि. ११ एप्रिल २०२६ Blow- Saturday Date 11 April 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com |
|---|---|---|---|---|---|---|

# मथुरेत बोट उलटली, १० जणांचा मृत्यू

## लुधियानाहून ३० लोक बोटीने करत होते प्रवास; ८ जणांची प्रकृती गंभीर, बचावकार्य सुरू असून पोलिस घटनास्थळी दाखल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : उत्तर प्रदेशातील मथुरामधून एक धक्कादायक बातमी समोर येत आहे. यमुना नदीत एक बोट (स्टीमर) उलटल्याची घटना घडली आहे. या अपघातात १० जणांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. तर १० ते १२ लोक बेपत्ता असल्याची माहिती देखील मिळत आहे. इतर अनेक जण बुडाल्याची भीती व्यक्त केली जात आहे. ही घटना केसी घाटाजवळ घडली आहे.

अपघाताबाबत जिल्हाधिकारी चंद्र प्रकाश सिंह यांनी दिलेल्या माहितीनुसार, दुपारी २ वाजून ४५ मिनीटांनी यमुना नदीत एक अत्यंत दुर्दैवी घटना घडली. लुधियानाहून ३० लोक बोटीने प्रवास करत होते. यावेळी केसी घाटाजवळ ही बोट उलटली. यामध्ये १० जणांचा मृत्यू झाला आहे. या ठिकाणी बचावकार्य सुरु केल्याची माहितीही त्यांनी दिली आहे. लोकांचा जीव वाचवण्याला आमचे प्राधान्य आहे. रुग्णालयांनाही सतर्क करण्यात आले आहे. रामकृष्ण मिशन रुग्णालय हे आमचे सर्वात मोठे रुग्णालय असून, आम्ही तेथे हाय अलर्ट जारी केल्याची माहिती त्यांनी दिली आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस आणि प्रशासकीय पथके घटनास्थळी दाखल झाली. डायव्हर्सच्या मदतीने जलद बचावकार्य सुरू आहे. आतापर्यंत यमुना नदीतून १३ जणांना बाहेर काढण्यात आले असून, त्यापैकी ८ जणांची प्रकृती गंभीर आहे, तर ५ जण सुरक्षित आहेत. बचावकार्य सुरू असून, घटनास्थळी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. प्रशासन



बेपत्ता लोकांचा शोध घेत आहे. या घटनेबाबत मथुरा एसपी (ग्रामीण) सुरेश चंद्र रावत यांनी सांगितले की, यमुना नदीत एक बोट उलटली. अनेकांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, या प्रकरणाची सखोल चौकशी सुरू आहे. किती लोक सुरक्षित आहेत आणि किती जणांनी दुर्दैवाने आपले प्राण गमावले आहेत, हे निश्चित करण्यासाठी आम्ही सध्या परिस्थितीचा आढावा घेत आहोत. तरंगता पूल खराब अवस्थेत होता आणि एक एजन्सी त्या तरंगत्या पुलांची दुरुस्ती करत होती. या सुरू असलेल्या दुरुस्तीच्या कामामुळेच हा अपघात झाला असावा, असा संशय आहे.

मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी मथुरेतील बोट उलटण्याच्या घटनेची दखल घेतली आहे. त्यांनी मृतांच्या कुटुंबीयांप्रति शोक व्यक्त केला आणि अधिकाऱ्यांना तात्काळ घटनास्थळी पोहोचून मदतकार्याला गती देण्याचे निर्देश दिले. त्यांनी अधिकाऱ्यांना मृतांच्या कुटुंबीयांना योग्य नुकसान भरपाई देण्याचे निर्देशही दिले.

# भाडेतत्त्वावरील परवडणाऱ्या घरांसाठी सक्षम यंत्रणा कार्यान्वित करा : मुख्यमंत्री

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मुंबईमध्ये नोकरी, व्यवसाय निमित्ताने बाहेरून मोठ्या संख्येने नागरिक येत असतात. त्यांच्याकरिता मोठ्या प्रमाणावर घरांची आवश्यकता असल्याने भाडेतत्त्वावरील परवडणाऱ्या घरांसाठी सक्षम यंत्रणा उभारून कार्यान्वित करावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. तसेच भाडेतत्त्वावरील परवडणाऱ्या घरांसाठी नागरिकांच्या सुविधांकरिता पोर्टल विकसित करण्याच्या सूचनाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिल्या.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, मुंबईसह अन्य महानगरांमध्ये नोकरी, व्यवसायनिमित्त आलेल्या नागरिकांसाठी परवडणाऱ्या दरात भाडेतत्त्वावरील घरे असली पाहिजेत. मागणीनुसार पुरवठा या तत्त्वावर भाडेतत्त्वाने घरे उपलब्ध होतील, याची काळजी घेण्यात यावी. घरांसाठी मागण्यांसंदर्भातील करारानुसार सर्व कार्यवाही होईल, याबाबतही यंत्रणेने दक्षता घेतली पाहिजे. उपलब्ध असलेल्या भाडेतत्त्वावरील घरांबाबत यंत्रणेने समन्वयाने कार्यवाही केल्यास मालक व भाडेकरू या दोघांनाही अडचण येणार नाही, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. महाराष्ट्र भाडे नियंत्रण अधिनियम, १९९९ अंमलबजावणीच्या सक्षमीकरण व सुलभी करणाबाबत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, या कायद्याअंतर्गत सक्षम प्राधिकारी म्हणून पोलीस उपायुक्त यांना नियुक्त करावे. पोलीस स्टेशन अथवा पोलिसांचे परिक्षेत्र वाढल्यास त्यानुसार आपोआप सक्षम अधिकारी वाढतील, अशी व्यवस्था करावी. पोलीस उपायुक्तांच्या कामकाज यादीमध्ये सक्षम प्राधिकारी म्हणून काम पाहण्याच्या कामकाजाचा समावेश करण्यासाठी अधिसूचना काढण्याची कार्यवाही करावी.

# महात्मा ज्योतिराव फुले यांच्या २०० व्या जयंतीनिमित्त राज्यात वर्षभर उपक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महात्मा ज्योतिराव फुले यांच्या २०० व्या जयंतीनिमित्त सन २०२७ हे द्विशताब्दी वर्ष राज्यात उत्साहात साजरे करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या अनुषंगाने शालेय शिक्षण विभागामार्फत ११ एप्रिल २०२६ ते १० एप्रिल २०२७ या कालावधीत राज्यातील सर्व शाळांमध्ये विविध शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक उपक्रम राबविण्याचा व्यापक कृती आराखडा जाहीर करण्यात आला आहे. शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी नुकतेच एक पत्र लिहून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना या अंतर्गतच्या उपक्रमांबाबत अवगत केले.

### शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांच्या पुढाकारातून शालेय शिक्षण विभागाचा व्यापक आराखडा जाहीर

महात्मा फुले हे आधुनिक भारतातील सामाजिक क्रांतीचे अग्रदूत, थोर समाजसुधारक आणि शिक्षणतज्ज्ञ म्हणून ओळखले जातात. त्यांनी जातीय विषमता, अंधश्रद्धा आणि शिक्षणावरील बंधने याविरुद्ध लढा देत सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून समता, सामाजिक न्याय आणि मानवी मुक्तीचा विचार जनसामान्यांपर्यंत पोहोचवला. स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या फुले दांपत्याने शिक्षण हेच समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन असल्याचे प्रत्यक्ष कृतीतून दाखवून दिले.



या पार्श्वभूमीवर, राज्य शासनाने फुले यांच्या जयंती द्विशताब्दी वर्षानिमित्त विद्यार्थ्यांमध्ये मूल्याधिष्ठित, समावेशक आणि कौशल्याधारित शिक्षणाची जाणीव निर्माण करण्यासाठी वर्षभर विविध उपक्रम आयोजित करण्याचे निर्देश दिले आहेत. ११ एप्रिल २०२६ रोजी सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये तसेच सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये महात्मा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून या उपक्रमांची सुरुवात होणार आहे.

या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची सवय रुजवण्यासाठी महात्मा फुले यांच्या कार्यावरील पुस्तके उपलब्ध करून देण्यात येणार असून शाळांमध्ये वाचनालये ज्ञानकेंद्र म्हणून विकसित केली जाणार आहेत. तसेच त्यांच्या विचारांवर आधारित व्याख्याने, वेबिनार, परिसंवाद आणि चर्चासत्रांचे आयोजन करण्यात येणार आहे. स्त्री शिक्षण, सामाजिक न्याय आणि समतेच्या विचारांचा प्रसार करण्यावर विशेष भर दिला जाणार आहे. शालेयस्तरावर पथनाट्य, एकपात्री नाटके, समता दौड, ग्रामभेट, पोस्टर स्पर्धा, निबंध स्पर्धा, विज्ञान उपक्रम, आयसीटी आधारित उपक्रम अशा विविध स्पर्धा व कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत. 'महात्मा फुले शैक्षणिक प्रेरणा सप्ताह' साजरा करून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव आणि नेतृत्वगुण विकसित करण्याचा प्रयत्न होणार आहे. याशिवाय, झर्हीश्रश२०० या अभियानांतर्गत विद्यार्थ्यांनी साजऱ्या केलेल्या उपक्रमांचे फोटो, व्हिडिओ आणि साहित्य ऑनलाइन अपलोड करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

'आनंददायी शनिवार' उपक्रमांतर्गत या सर्व कृती कार्यक्रमांचे आयोजन शाळांसाठी अनिवार्य राहणार असून विद्यार्थ्यांचा सहभाग ऐच्छिक असेल. महिनानिहाय आखलेल्या कृती आराखड्यानुसार एप्रिलमध्ये जनजागृती, जूनमध्ये पर्यावरण व जलसंवर्धन, जुलैमध्ये सामाजिक समता, ऑगस्टमध्ये समाजसेवा, सप्टेंबरमध्ये नवोपक्रम, ऑक्टोबरमध्ये स्त्री सक्षमीकरण, नोव्हेंबरमध्ये नेतृत्व व नागरिकत्व, डिसेंबरमध्ये सांस्कृतिक विकास, जानेवारीत संशोधन प्रकल्प, फेब्रुवारीत विविध स्पर्धा आणि मार्च २०२७ मध्ये समारोप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.

## झोपडपट्टी प्राधिकरणाची १६ वी बैठक संपन्न

# लोकशाहीर साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे आंतरराष्ट्रीय स्मारकाच्या कामास गती द्या : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




मुंबई : घाटकोपर येथील लोकशाहीर साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे आंतरराष्ट्रीय स्मारकासाठी ३३२.६२ कोटी रुपयांच्या तरतुदीस मान्यता देण्यात आली असून या प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या अपात्र झोपडीधारकांना सुद्धा भाडेतत्वावरील घरे योजनेतर्गत घरे देण्यात यावीत. तसेच स्मारकाचे काम गतीने पूर्ण करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई (एसआरए) ची १६ वी बैठक सह्याद्री अतिथीगृह येथे झाली. यावेळी मुख्यमंत्र्यांचा हस्ते प्राधिकरण कार्यालयातील विविध कक्षांचे ऑनलाइन उद्घाटन झाले. झोपुप्रा, बृहन्मुंबईने संपादित केलेल्या बृहन्मुंबईतील झोपडपट्टी पुनर्वसन योजनांच्या अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक तत्त्वे या पुस्तकाचे आणि प्राधिकरणाच्या दिनदर्शिकेचे अनावरण मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी केले.

यावेळी नगर विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, गृहनिर्माण अपर मुख्य सचिव असीमकुमार गुप्ता, बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त आश्विनी भिडे, मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, विधि व न्याय प्रधान सचिव दिलीप घुमरे, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबईचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्यासह प्राधिकरणातील अधिकारी उपस्थित होते.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या संयुक्त भागीदारी प्रकल्पांना मिळणारा अल्प प्रतिसाद, रखडलेले प्रकल्प, अव्यवहार्य योजना यांचा विचार करता शासनामार्फत सन २०२५ मध्ये निर्गमित करण्यात आलेल्या राज्य गृहनिर्माण धोरण २०२५ अनुषंगाने शासनामार्फत अंमलात आणलेल्या झोपडपट्टी समूह पुनर्विकास योजनेअंतर्गत समूह क्षेत्रांचा एकात्मिक व शाश्वत विकास करण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये ५० एकर किंवा त्यापेक्षा अधिकच्या भूखंडावरील प्रकल्प हे योजनेमध्ये पुनर्विकसीत करण्याचा निर्णय झाला असून त्याबाबत प्राधिकरणामार्फत समूह क्षेत्र निश्चित करण्याची प्रक्रिया सुरू आहे, याचा आढावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला. या योजनेअंतर्गत अंदाजे ६ ते ७ लाख झोपडी धारकांना पुनर्वसनाचा लाभ होणार आहे.

माता रमाबाई आंबेडकर नगर आणि कामराज नगर येथील योजनेसाठी अतिरिक्त ९७ कोटी रुपयांच्या वाढीव निधीस मंजुरी देण्यात आली असून यासाठी आता एकूण ५९७ कोटी निधी आता वापरात येणार आहे.

या बैठकीदरम्यान मुख्यमंत्र्यांनी झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गतच्या योजनांमधून उपलब्ध होणाऱ्या प्रकल्पग्रस्त पुनर्वसन सदनिकांचा आढावा घेण्याच्या सूचना दिल्या.

'झोपु' प्राधिकरणाच्या नेत्रम प्रकल्पाचे कौतुक

झोपडपट्टी प्राधिकरणाच्या वतीने बेकायदेशीर अतिक्रमणाला आळा बसावा, अतिक्रमणाबाबत माहिती मिळावी, यासाठी प्रधानमंत्री गतीशक्ति अभियांनाअंतर्गत 'नेत्रम' ही संगणकीय प्रणाली तयार करण्यात आली आहे. याद्वारे सॅटेलाईट छायाचित्रांच्या माध्यमातून मुंबईतील अतिक्रमणांवर लक्ष ठेवण्यात येते. तसेच अतिक्रमण होत असल्याचे आढळून आल्यास संबंधितांना त्याची माहिती दिली जाते. अतिक्रमण रोखण्यासाठी ही प्रणाली महत्त्वाची असल्याचे सांगून या उपक्रमाचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी कौतुक केले. 'नेत्रम'द्वारे प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे अतिक्रमण दूर करण्याच्या कार्यवाहीसाठी अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करण्याचे निर्देश मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिले. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातील कंत्राटी चतुर्थ श्रेणी कर्मचारीवर्ग यांना कायमस्वरूपी नियुक्ती करण्याबाबत निर्णय मुख्यमंत्री फडणवीस यांनी घेतला.

बृहन्मुंबई महापालिकेकडील झोपडपट्टी प्राधिकरणात कार्यरत असणाऱ्या अभियंत्यांची सेवा प्राधिकरणात समायोजित करण्यास यावेळी मान्यता देण्यात आली. एकूण आकृतीबंधाच्या ३० टक्के इतक्या पदांचे समायोजन करण्यात यावे, असेही यावेळी ठरविण्यात आले.

यावेळी मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, झोपडपट्टी प्राधिकरणाशी संबंधितांना त्यांच्या कामासाठी कार्यालयात यायची गरज पडू नये, यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आधारावर यंत्रणा उभारण्यात यावी. तसेच स्वयंचलित विकास नियंत्रण नियम तपासणी (ीं ऊਠ) प्रणालीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (ख) चा वापर करून संपूर्ण प्रक्रिया मानवी हस्तक्षेप विरहित करावी. ही प्रणाली २४÷७ सुरू रहावी. म्हाडा, बृहन्मुंबई महापालिकांमध्येही अशी प्रणाली विकसित करण्यात यावे.

यावेळी डॉ. कल्याणकर यांनी सांगितले की, प्राधिकरणाच्या वतीने माहिती तंत्रज्ञान धोरणानुसार २२ कामकाज प्रणाली डिजिटल स्वरूपात नागरिकांना उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. तसेच इज ऑफ ड्युइंग बिझनेसअंतर्गत भाड्याची थकबाकीची वसुली मोठ्या प्रमाणात करण्यात येत आहे. प्राधिकरणाच्या विविध प्रकल्पात राहणाऱ्या अनधिकृत व्यक्तिंना बाहेर काढण्याची कारवाई गेल्या वर्षभरात मोठ्या प्रमाणात करण्यात आली. तसेच अनधिकृत झोपडपट्ट्यांवरही मोठ्या प्रमाणात कार्यवाही करण्यात आली आहे.



## संपादकीय....

### जनतेला दिलासा

मुंबईमध्ये नोकरी, व्यवसाय निमित्ताने बाहेरून मोठ्या संख्येने नागरिक येत असतात. त्यांच्याकरिता मोठ्या प्रमाणावर घरांची आवश्यकता असल्याने भाडेतत्त्वावरील परवडणाऱ्या घरांसाठी सक्षम यंत्रणा उभारून कार्यान्वित करावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. तसेच भाडेतत्त्वावरील परवडणाऱ्या घरांसाठी नागरिकांच्या सुविधांकरिता पोर्टल विकसित करण्याच्या सूचनाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिल्या. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, मुंबईसह अन्य महानगरांमध्ये नोकरी, व्यवसायनिमित्त आलेल्या नागरिकांसाठी परवडणाऱ्या दरात भाडेतत्त्वावरील घरे असली पाहिजेत. मागणीनुसार पुरवठा या तत्त्वावर भाडेतत्त्वाने घरे उपलब्ध होतील, याची काळजी घेण्यात यावी. घरांसाठी मागण्यांसंदर्भातील करारानुसार सर्व कार्यवाही होईल, याबाबतही यंत्रणेने दक्षता घेतली पाहिजे. उपलब्ध असलेल्या भाडेतत्त्वावरील घरांबाबत यंत्रणेने समन्वयाने कार्यवाही केल्यास मालक व भाडेकरू या दोघांनाही अडचण येणार नाही, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. महाराष्ट्र भाडे नियंत्रण अधिनियम, १९९९ अंमलबजावणीच्या सक्षमीकरण व सुलभी करणाबाबत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, या कायद्याअंतर्गत सक्षम प्राधिकारी म्हणून पोलीस उपायुक्त यांना नियुक्त करावे. पोलीस स्टेशन अथवा पोलिसांचे परिक्षेत्र वाढल्यास त्यानुसार आपोआप सक्षम अधिकारी वाढतील, अशी व्यवस्था करावी. पोलीस उपायुक्तांच्या कामकाज यादीमध्ये सक्षम प्राधिकारी म्हणून काम पाहण्याच्या कामकाजाचा समावेश करण्यासाठी अधिसूचना काढण्याची कार्यवाही करावी. भाडेदर संदर्भातील न्यायालयीन प्रकरणे निकाली काढण्यासाठी १०० विशेष न्यायालये स्थापन करावी. यासाठी सेवानिवृत्त न्यायाधीशांची नियुक्ती करावी. न्यायालयाच्या परवानगीने भाडेदर संदर्भातील प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी सायंकाळचे न्यायालय सुरू करावे या न्यायालयांसाठी जागा नसल्यास भाडेतत्त्वावर जागा घेण्यात याव्यात. यामुळे वर्षानुवर्ष प्रलंबित असलेली प्रकरणे निकाली निघतील.

# बिगारी कामगार ते ब्रँच सेल्स मॅनेजर : वागदरीच्या सचिन बंगरगी यांचा प्रेरणादायी संघर्षमय प्रवास...

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट तालुक्यातील वागदरी गावचा सुपुत्र सचिन बंगरगी यांचा बिगारी कामगार ते ब्रँच सेल्स मॅनेजर असा प्रवास अनेक तरुणांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रम यांच्या बळावर आयुष्यात अशक्य वाटणाऱ्या गोष्टीही साध्य करता येतात याचे जिवंत उदाहरण म्हणजे सचिन बंगरगी होय. सध्या ते पुणे येथे कळ्रूक्रउ इरपज्ञ मध्ये वाकडेवाडी, शिवाजीनगर शाखेत ब्रँच सेल्स मॅनेजर म्हणून कार्यरत आहेत.


सचिन बंगरगी यांचे बालपण अत्यंत साध्या आणि कष्टमय परिस्थितीत गेले. घरची आर्थिक परिस्थिती बेताची असल्यामुळे लहानपणापासूनच संघर्ष त्यांच्या वाट्याला आला. त्यांचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद शाळेत झाले, तर पुढील शालेय शिक्षण वागदरी येथील शेळके प्रशालेत पूर्ण झाले. शिक्षण घेत असतानाच आयुष्यात काहीतरी मोठं करायचं, स्वतःच्या कष्टावर उभं राहायचं अशी जिद्द त्यांच्या मनात होती.

शालेय शिक्षण पूर्ण झाल्यानंतर रोजगाराच्या शोधात त्यांनी पुण्याकडे वाटचाल केली. पुण्यात सुरुवातीला कात्रज परिसरात कात्रज अप्पू कलशेट्टी यांच्या सोबत त्यांनी बिगारीची कामे केली. अनेक वेळा हाताला काम नसताना वडापाव खाऊन दिवस काढावे लागले. मात्र परिस्थिती कितीही कठीण असली तरी हार मानायची नाही हा निर्धार त्यांनी कायम ठेवला.

यानंतर त्यांनी पुणे-मुंबई टोल नाक्यावर काम केले. धुळीमुळे आरोग्याच्या समस्या निर्माण होत असतानाही त्यांनी काम सोडले नाही. त्या काळात सहनशीलता, कष्ट करण्याची तयारी आणि ध्येयाप्रती असलेली चिकाटी यांची खरी परीक्षा सुरू होती.

पेपर वाचण्याची सवय ही त्यांच्या आयुष्यातील महत्त्वाची गोष्ट ठरली. नोकरीच्या संधी शोधत असताना त्यांना एका चार्टर्ड अकाउंटंटकडे काम करण्याची संधी मिळाली. त्या ठिकाणी काम करताना बँकिंग क्षेत्रातील अनेक गोष्टी समजल्या आणि पुढे या क्षेत्रात काम करण्याची प्रेरणा मिळाली.

मात्र मिळणारा पगार अत्यल्प असल्यामुळे आर्थिक अडचणी कायम होत्या. घरूनही स्वतःचा खर्च स्वतः पाहा किंवा गावी परत या अशी परिस्थिती निर्माण झाली होती. त्यामुळे काही काळ त्यांनी गावी जाऊन शेतीकामही केले. पण हार न मानता त्यांनी पुन्हा पुण्यात येऊन कामाला सुरुवात केली. काही काळ त्यांनी मेडिकल क्षेत्रातही काम केले.




एके दिवशी वर्तमानपत्र वाचताना त्यांना बँकेत नोकरीसाठी भरतीची जाहिरात दिसली. गुजरात येथे तीन महिन्यांचे प्रशिक्षण घेणे आवश्यक होते. परंतु प्रशिक्षणाचा खर्च भागवणे त्यांच्यासाठी मोठे आव्हान होते. घरची परिस्थिती लक्षात घेऊन त्यांनी मित्राकडे मदतीची विनंती केली. मित्राने मदत केल्यामुळे त्यांना प्रशिक्षण घेता आले आणि त्यानंतर एका बँकेत आठ ते दहा हजार रुपयांच्या पगारावर नोकरी मिळाली.

याच टप्प्यापासून त्यांच्या आयुष्यात खऱ्या अर्थाने बदल घडू लागला. मिळालेल्या प्रत्येक संधीचे त्यांनी सोन केले. मेहनत, प्रामाणिकपणा आणि कामातील सातत्य यामुळे त्यांनी बँकिंग क्षेत्रात स्वतःचे स्थान निर्माण केले. त्यांनी जवळपास पाच वर्षे खउखउख इरपज्ञ मध्ये काम केले आणि त्यानंतर कळ्रूक्रउ इरपज्ञ मध्ये प्रवेश केला.

आज ते पुणे येथे ब्रँच सेल्स मॅनेजर या जबाबदारीच्या पदावर कार्यरत असून त्यांना सुमारे ऐंशी हजार रुपयांचा पगार व इतर सुविधा मिळत आहेत. बिगारी कामगार म्हणून सुरू झालेला हा प्रवास आज बँकेच्या महत्त्वाच्या पदापर्यंत पोहोचला आहे.

सचिन बंगरगी यांची ही संघर्षमय यशोगाथा ग्रामीण भागातील तरुणांसाठी प्रेरणादायी आहे. परिस्थिती कितीही कठीण असली तरी जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर स्वप्न पूर्ण करता येतात, हे त्यांनी आपल्या कर्तृत्वातून सिद्ध करून दाखवले आहे.

सचिन आपल्या मित्र मंडळीना वेळोवेळी योग्य मार्गदर्शन सहकार्य करतं असतो काही दिवसांपूर्वी गावगाथा मीडिया नेटवर्क करंट अकाउंट काढण्यासाठी सचिन बंगरगी यांची भेट घेतली यावेळी सविस्तर चर्चा करताना संघर्षमय प्रवासाचा उलगडा झाला..

प्रेरणादायी प्रवास मांडण्याचा प्रयत्न केला आहे

आपल्या भागातील आपलं संघर्षमय प्रवास यशोगाथा साठी नक्कीच संपर्क साधा

९८५०६१९७२४/८८६३२१४५

**– धोंडपा नंदे, गावगाथा**

# संत गाडगेबाबा यांनी किर्तनातून समाजप्रबोधन केले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : संत गाडगेबाबा हे कतीशिल संत होते. त्यांनी किर्तनाच्या माध्यमातून समाजातील अनिष्ट प्रथा, परंपरा, अंधश्रद्धा कर्मकांड, जातिभेद यावर प्रहार केला.तसेच त्यांनी आपल्या किर्तनात स्वच्छतेचे व शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. त्यांच्या किर्तनातून ते महात्मा जोतिराव फुले, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा कार्याचा गौरव करत असत.संताच्या विचारांचा प्रसार व प्रचार त्यांनी केला.

महापुरुषांचा वारसा आपण पुढे नेला पाहिजे असे प्रतिपादन प्रबोधनकार डॉ सुनिल धनगर यांनी बार्टी संस्थेत समता सप्ताह कार्यक्रमांत प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलताना व्यक्त केले.

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त दिनांक ९ एप्रिल २०२६ रोजी बार्टी सभागृहात संत गाडगेबाबा

**बार्टीत समता सप्ताहाचे आयोजन**

यांचे प्रबोधन या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

याप्रसंगी निबंधक डॉ सुचिता शिंदे, विभागप्रमुख शुभांगी पाटिल, डॉ बबन जोगदंड, लेखाधिकारी नितीन चव्हाण यांच्यासह बार्टी संस्थेतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

प्रथम संविधान प्रास्ताविकेचे सामुदायिक पणे वाचण करण्यात आले. सुत्रसंचलन रामदास लोखंडे यांनी केले. प्रास्ताविक कार्यालय अधिक्षक प्रज्ञा मोहिते यांनी केले. आभार वैशाली खांडेकर यांनी मानले.




# मा. एकनाथ शिंदे शिवसेना गटाच्या ओ.बी.सी. सोलापूर जिल्हा उपाध्यक्षपदी प्रदीप भोसले यांची निवड



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर येथील प्रदीप भोसले यांना महाराष्ट्र राज्य चे उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे शिवसेना गटाच्या ओबीसी सोलापूर जिल्हा उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली निवड सोलापूर जिल्हा ओबीसीउपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. ही निवड रमेश बारस्कर प्रदेश प्रमुख यांच्या आदेशानुसार व सोलापूर जिल्हा प्रमुख ओबीसी राजकुमार हिवरकर यांनी केली आहे ही निवड हे पत्र बारस्कर यांनी दिले आहे यांचा सत्कार सत्कार केला आहे.

यावेळी शिंदे गटाचे नेते अरुण भाऊ कोळी, पांडुरंग शिंदे, जितेंद्र भोसले अकबर आधार प्रज्योत भोसले, आकाश नाळे राज जाधव, आधी मान्यवर उपस्थित होते व प्रदीप भोसले यांचा स्वभाव मनमिळावू स्वभावाचे आहे लवकरच भोसले यांची ओबीसी एकत्र येण्यासाठी पंढरपूर तालुका दौरा करतील व प्रदीप भोसले यांना सोलापूर जिल्हा उपाध्यक्षपदी निवड झाल्याचे सर्व शहरातून त्यांचे अभिनंदन केले जात आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त भीमजन्मोत्सव समितीच्या वतीने वक्तृत्व स्पर्धा, वेशभूषा स्पर्धा व नृत्य स्पर्धांचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पारा प्रतिनिधी/प्रेम शिनगारे : वाशी तालुक्यातील पारा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त भीमजनमोस्तव समितीच्या वतीने दि. १० भीमनगर येथे वक्तृत्व स्पर्धा, वेशभूषा स्पर्धा व नृत्य स्पर्धांचे उत्साहात आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमांना नागरिक, पालक व विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.





वक्तृत्व स्पर्धेत विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने व प्रभावी शैलीत आपले विचार मांडत उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. अनेक विद्यार्थ्यांनी सामाजिक विषयांवर भाष्य करत आपल्या विचारांची परिपक्वता दाखवून दिली.

वेशभूषा स्पर्धेत लहानग्यांनी विविध महान व्यक्तींची रूपे साकारत आपल्या अभिनयातून आणि सादरीकरणातून प्रेक्षकांची मने जिंकली. त्यांच्या सर्जनशीलतेचे सर्वत्र कौतुक करण्यात आले.

नृत्य स्पर्धेतही सहभागी विद्यार्थ्यांनी उत्साहपूर्ण आणि रंगतदार सादरीकरण करत कार्यक्रमाला वेगळीच उंची दिली. त्यांच्या कलागुणांमुळे संपूर्ण वातावरण आनंदी व उत्साही झाले. या सर्व कार्यक्रमांच्या यशस्वीतेसाठी भीमनगरमधील तरुणांनी विशेष मेहनत घेतली असून, नियोजनबद्ध पद्धतीने कार्यक्रम पार पाडला. नागरिक, शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांच्या सहकार्यामुळे हा उपक्रम अत्यंत यशस्वी ठरला असून, सर्व स्तरांतून त्याचे कौतुक करण्यात येत आहे.

# खरीप हंगाम २०२६ : खत कंपन्यांनी युरिया, डीएपी खताचा १०० टक्के संरक्षित साठा ठेवणे बंधनकारक : जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस.

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

**खत कंपन्यांनी कोणत्याही परिस्थितीत लिंकिंग करून खताची विक्री करू नये**

सोलापूर : खरीप हंगाम २०२६ साठी सोलापूर जिल्ह्याचा खत संरक्षित साठा १० हजार ६०० मेट्रिक टन इतका करण्यात आलेला आहे. यामध्ये युरिया ९ हजार ३५० मेट्रिक टन व डीएपी १ हजार २५० मेट्रिक टन आहे. तरी खत कंपन्यांनी सोलापूर जिल्ह्याचा खतांचा बफर स्टॉक १००% ठेवावा. या स्टॉकमध्ये कोणत्याही परिस्थितीत कमतरता होणार नाही याबाबतची दक्षता घ्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित जिल्हास्तरीय कृषी निविष्ठा सनियंत्रण समिती आढावा बैठकीत जिल्हाधिकारी कार्तिकेयन बोलत होते. यावेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले, जिल्हा परिषदेचे जिल्हा कृषी विकास अधिकारी हरी हावळे, जिल्हा विपणन अधिकारी मनोज वाजपेयी, इफको खत कंपनीचे रवींद्र मोरे, इंडियन पोटॅश कंपनीचे ओंकार रनवरे, नॅशनल फर्टीलायझर कंपनीचे पवनलाल हुकरे, राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टीलायझर्सचे सागर कांबळे यांच्यासह आणि सर्व संबंधित अधिकारी व खत व बियाणे कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी कार्तिकेयन पुढे म्हणाले की मागील वर्षीच्या खरीप हंगामात खत कंपन्यांनी बफर स्टॉक फक्त ५४% ठेवलेल्या होता. त्यामुळे यावर्षी पुणे येथील कृषी आयुक्तालयचे निविष्ठा संचालक यांनी सोलापूर जिल्ह्यासाठी जेवढा खताचा संरक्षित साठा उपलब्ध करून दिलेला आहे, तेवढा शंभर टक्के साठा संरक्षित ठेवला पाहिजे. यामध्ये कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही, असे स्पष्ट निर्देश त्यांनी दिले.

त्याप्रमाणेच सर्व खत कंपन्यांनी व बियाणे कंपन्यांनी कोणत्याही प्रकारचे लिंकिंग न करता खते व बियाण्याची विक्री शेतकऱ्यांना करावी याबाबतीत कोणत्याही प्रकारची तक्रार आल्यास किंवा कृषी विभागाच्या पथकांना तसे आढळून आल्यास संबंधित कंपन्यावर अत्यंत कठोर कारवाई प्रस्तावित करण्यात येईल असेही निर्देश जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी दिले. तसेच खत कंपन्यांनी त्यांचे सोलापूर येथे रॅक पॉईट तयार केले पाहिजे. तसेच जेवढा खतांचा साठा सोलापूर जिल्ह्यासाठी येणार आहे त्याचे सम प्रमाणात जिल्ह्यात सर्वत्र वितरण झाले पाहिजे त्याचे नियोजन सूक्ष्मपणे करावे आणि खत कंपन्याकडून किमान तीन ते चार दिवस अगोदर रॅक पॉईंट उपलब्ध होणार आहे, याची माहिती कृषी विभागाला द्यावी, असेही त्यांनी निर्देशित केले.

प्रारंभी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी सांगितले की, सोलापूर जिल्ह्याच्या पीक पद्धतीत मागील काही वर्षात बदल होत आहे. तसेच खरिपाच्या पीक क्षेत्रात ही वाढ होत आहे. सोयाबीन ऊस, तूर, उडीद व मका या पिकांची वाढ झालेली आहे. सोलापूर जिल्ह्यात खतांचा विषय अत्यंत संवेदनशील आहे. तसेच कृषी निविष्ठा विक्रेत्यांमध्ये खते विक्रेते ३,११०, बियाणे विक्रेते ३०२७ आणि कीटकनाशके विक्रेते २९३० इतके असून जवळपास दहा ते बारा खत कंपन्याकडून सोलापूर जिल्ह्याला खतांचा पुरवठा होत असतो असेही त्यांनी सांगितले.

खरीप हंगाम २०२६ मध्ये युरिया डीएपी एम ओ पी एस एस पी संयुक्त खते अशी एकूण मागणी दोन लाख ९५ हजार ५६ मीटिंग इतकी असून दोन लाख ५१ हजार ९५८ प्राप्त झाल्याचे त्यांनी सांगितले. निविष्ठा व गुण नियंत्रक संचालक यांच्या आदेशानुसार सोलापूर जिल्ह्याला दहा हजार सहाशे मेट्रिक टन खताचा बफर स्टॉक मिळाल्याचे श्री. भोसले यांनी सांगून खरीप हंगामासाठी बियाणे मुबलक प्रमाणात उपलब्ध असल्याचेही त्यांनी म्हटले.

यावेळी खत कंपन्यांच्या प्रतिनिधी कडून जिल्ह्याला मिळाला बफर स्टॉक १००% ठेवण्यात येईल असे सांगितले तर महाबीज कंपनीकडून मुबलक प्रमाणात बियाणे उपलब्ध करून मिळतील असे सांगितले तर वितरक असोसिएशन च्या वतीने जिल्ह्यातील अकरा तालुक्यांना सम प्रमाणात खत पुरवठा होत नसल्याबाबत सांगून सोलापूर येथे खत कंपन्यांनी रॅक पॉइंट तयार करण्याबाबत मागणी केली.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# दहावीनंतरच्या करिअरविषयी विशेष मार्गदर्शनपर चर्चासत्राचे आयोजन

## प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ आणि करिअर समुपदेशक विवेक वेलणकर यांचे मार्गदर्शन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : प्रत्येक विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील महत्त्वाचा टप्पा म्हणजे दहावी आणि त्यानंतर प्रश्न पडतो दहावीनंतर पुढे काय? हा प्रश्न विद्यार्थी आणि पालक दोघांसाठीही चिंतेचा विषय असतो. या महत्त्वाच्या आणि निर्णायक टप्प्यावर योग्य दिशा मिळावी आणि करिअर निवडीतील संभ्रम दूर व्हावा, यासाठी माईर्स एमआयटी पुणे संचालित, एमआयटी विश्र्वशांती गुरुकुल वाखरी, पंढरपूर येथे एमआयटी ज्युनिअर कॉलेजच्या वतीने शनिवार, दिनांक ११ एप्रिल रोजी विशेष करिअर मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या करिअर मार्गदर्शन विशेष चर्चसत्रात प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ आणि करिअर समुपदेशक विवेक वेलणकर विद्यार्थी व पालकांना दहावीनंतर करिअरची निवड कशी करावी आणि विविध क्षेत्रातील संधींविषयी सखोल मार्गदर्शन करणार आहेत. तसेच एनडीए (NDA) म्हणजेच संरक्षण क्षेत्रातील करिअरच्या संधींविषयी कर्नल डी. के. उपाध्याय मार्गदर्शन करणार आहेत. आजच्या बदलत्या काळात उपलब्ध असलेले विविध करिअरचे पर्याय, यासाठी द्याव्या लागणाऱ्या प्रवेश परीक्षा कोणत्या आणि त्यांची तयारी याविषयी सखोल मार्गदर्शन यावेळी करण्यात येईल. विद्यार्थ्यांनी आपल्या भविष्यास योग्य दिशा देण्यासाठी आणि योग्य निर्णय घेण्यासाठी या सुवर्णसंधीचा अवश्य लाभ घ्यावा, असे आवाहन माईर्स एमआयटी विश्वशांती गुरुकुलतर्फे करण्यात आले आहे.

कार्यक्रमातील मार्गदर्शनाचे प्रमुख विषय:

- NDA, JEE, NEET, NAVY यांसारख्या प्रवेश आणि स्पर्धा परीक्षांची प्रभावी तयारी कशी करावी
- सायन्स व कॉमर्स शाखांमधील आधुनिक व उच्च संभाव्यतेचे करिअर पर्याय
- योग्य कोर्स निवडीसाठी आवश्यक निकष व भविष्यातील आव्हाने
- विद्यार्थ्यांच्या आणि पालकांच्या सर्व शंकांचे थेट निरसन

**विशेष वाहतूक सुविधा:**

विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी पंढरपूर येथील बस स्टँड, अर्बन बँक, शिवाजी महाराज चौक व ठाकरे चौक येथून दुपारी ४.३० वाजता बसची विनामूल्य व्यवस्था करण्यात आली आहे.

कार्यक्रमाविषयी - कधी, केंव्हा, कुठे:

- दिनांक: शनिवार, ११ एप्रिल २०२६
- वेळ: सायंकाळी ५.०० ते ७.००
- स्थळ: एमआयटी विश्वशांती गुरुकुल कॅम्पस सभागृह, वाखरी पालखीतळ, पंढरपूर
- प्रवेश: सर्व १० वी उत्तीर्ण विद्यार्थी व पालकांसाठी पूर्णपणे मोफत
- अधिक माहितीसाठी व नोंदणीसाठी ९२०९०४३७३९ या क्रमांकावर संपर्क साधावा

# आगामी सण, उत्सव, जयंती शांततेत साजरे होण्यासाठी शहर पोलिसांचा रूट मार्च



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : आगामी सण, उत्सव, जयंती हे शांततेत पार पाडण्याच्या अनुषंगाने पंढरपूर शहर पोलीस स्टेशन यांच्याकडून रूट मार्च घेण्यात आला. तसेच नागरिकांना आगामी उत्सव, जयंती शांततेत व सामाजिक सलोखा ठेवून साजरे करण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या. त्याचबरोबर आक्षेपार्ह ,धार्मिक व सामाजिक सलोखा बिघडेल अशा पोस्ट सोशल मीडियावर टाकणाऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल अशा सूचनाही देण्यात आल्या. सदर रूट मार्च पंढरपूर शहरातील प्रमुख मार्गावरून घेण्यात आला.

या रूट मार्च मध्ये सहाय्यक पोलिस अधीक्षक प्रशांत डगळे, पोलीस निरीक्षक दशरथ वाघमोडे, पंढरपूर शहर पोलीस स्टेशनचे चार पोलीस अधिकारी व ३३ पोलीस अंमलदार सहभागी झाले होते.

# एनडीएसटी सोसायटीच्या उपाध्यक्षपदी संग्राम करंजकर



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : जिल्ह्यातील शिक्षकांची अग्रगण्य संस्था असणाऱ्या नाशिक डिस्ट्रिक्ट सेकंडरी टीचर्स ण्ड नॉन टीचिंग को-ऑपरेटिव्ह सोसायटीच्या उपाध्यक्षपदी भगूर नगरपरिषदचे माजी नगरसेवक संग्राम शिवाजीराव करंजकर यांची बिनविरोध निवड झाली. सोसायटीचे अध्यक्षा विजया पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या सभेत ही निवड करण्यात आली. यावेळी ज्येष्ठ नेते शिवाजीराव निरगुडे, बाळासाहेब सूर्यवंशी, प्रा.रवींद्र मोरे, साहेबराव कुटे,नगरसेवक साहेबराव बर्डे, नगरसेवक संदीप जेऊघाले,बाबा गुंजाळ,श्री माणकेश्वर वाचनालायचे सहचिटणीस राहुल दवते,किशोर जाधव, निलेश ठाकूर, यशवंत ठोके या मान्यवरांसह मावळते उपाध्यक्ष विलास जाधव, सेक्रेटरी प्राचार्य अशोक बागुल, ज्येष्ठ संचालक, अरुण पवार, मोहन चकोर, बाळासाहेब ढोबळे संजय देसले, दत्तात्रय आदिक, दीपक व्याळिज, निंबा कापडणीस,मंगेश सूर्यवंशी, समीर जाधव, अनिल देवरे, भारती पाटील, एस.टी.पाटील, संजय वाघ, गंगाधर पवार, एस.पी.देवरे, सचिन पगार, भाऊसाहेब शिरसाठ, चंद्रशेखर सावंत आदींसह शिक्षण क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. या निवडीबद्दल संग्राम करंजकर यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# बलसुर, माडज येथील वीज कर्मचाऱ्यांचा टोपी देऊन गौरव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उमरगा/प्रतिनिधी : महावितरणच्या उमरगा उपविभागांतर्गत येणाऱ्या बलसुर शाखेने वीज बिल वसुली मोहिमेत कामगिरी करत घवघवीत यश संपादन केले आहे. या यशाचे मानकरी असलेले लाईनमन आणि तांत्रिक कर्मचारी यांच्या अथक परिश्रमांचे कौतुक करण्यासाठी, कनिष्ठ अभियंता अलीम सय्यद यांच्या वतीने विशेष सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.

वसुली मोहिमेदरम्यान बलसुर शाखेने अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने काम करून वरिष्ठ कार्यालयाने दिलेले उद्दिष्ट पूर्ण केले आहे. या मोहिमेत अहोरात्र कष्ट घेणाऱ्या बलसुर व माडज येथील सर्व लाईनमन, जनमित्र, बाह्यस्त्रोत



कर्मचारी आणि यंत्रचालक यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. सर्व कर्मचाऱ्यांना सन्मानपूर्वक टोपी भेट देऊन त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला.

या सत्कार सोहळ्याप्रसंगी एम.टी. बनसोडे, महंमद लदाफ, मोहन गुरव, एस.एम. स्वामी, विनोद कुंभार, आसिफ सय्यद, लहु गावडे, एस.आर. पवार,विश्वजित कुंभार, निवृत्ती गुराळे, संतोष बडूरे, राजू निंगणमोडे आणि किरण राठोड उपस्थित होते.

तसेच यंत्रचालक कल्याण पवार, सुरज गायकवाड, हनुमंत पवार, भीमराव गायकवाड, राजेंद्र जाधव, स्वामी, सैफ शेख, शिवा माळी, डी.एम. शेंबडे, तुकाराम सूर्यवंशी, तानाजी जाधव, पडवळ, गुणवंत कांबळे, अनिश शेख, मंथन बिराजदार, सचिन सुरवसे, अमोल खरोसे, अजित शिंदे, पदम्पल्ले, मारुती सोनकडे,भालचंद्र चिरे, अशोक गायकवाड यांच्यासह सर्व लाईनमन व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या व्यवस्थापकपदी प्रवीण धन यांची नियुक्ती



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : गेले काही दिवसापासून श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीला प्रभारी व्यवस्थापक नेमणूक केलेली होती पण त्यांना काम करता येत नसल्यामुळे.

बऱ्याच मंदिर समितीचे व्यवस्थापक पद रिक्त असल्यामुळे त्या ठिकाणी कायमस्वरूपी मंदिर समितीचे काम करण्यासाठी पूर्ण वेळ मंदिर समितीला व्यवस्थापक पद भरणे आवश्यक होते.

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या व्यवस्थापक पदी प्रवीण धन यांची नियुक्ती करण्यात आले आहे. मंदिर समितीचे व्यवस्थापक श्री मनोज श्रोत्री यांची बदली झाल्यानंतर त्या ठिकाणी प्रभारी व्यवस्थापक म्हणून नेमणूक करण्यात आली होती. त्यांना मंदिर समितीचे प्रभारी असल्यामुळे काम करता येत नसल्यामुळे येथे. कायमस्वरूपी व्यवस्थापक नेमणूक करावी अशी मागणी होत होती. त्या मागण्यानुसार श्री प्रवीण धन यांची मंदिर समितीच्या व्यवस्थापक पदी नियुक्ती करण्यात आली आहे.

# निर्भया पथकाने पंढरपुरातील बालविवाह रोखला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर शहर व परिसरात एका अल्पवयीन मुलीचा बालविवाह रोखण्याचा निर्भय पथकाला यश आले आहे.

पंढरपूर शहरांमध्ये एका अल्पवयीन मुलीचा बालविवाह होत असल्याची माहिती पंढरपूर उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत डगळे यांना माहिती मिळाली त्यांनी तात्काळ निर्भयपतकाला त्या ठिकाणी पाठवून दिले. निर्भया पथकाच्या पोलीस उपनिरीक्षक सुप्रिया यादव खोपोलीस आणि येथे जाऊन चौकशी केली. मुलीच्या आई-वडिलांनी बनावट आधार कार्ड बनवून मुलीची १८ वर्षे वय पूर्ण केले पोलिसांना त्याचा संशय आल्यामुळे पोलिसांनी ती मुलगी शिकत असलेले शाळेत जाऊन चौकशी केली असता मुलीचे वय पंधरा वर्षे सहा महिने दिसून आले आहे. या मुलीचा विवाह २७ वर्ष असलेल्या तरुणाशी करण्यात येत होता.

बालविवाह रोखण्याची कामगिरी पंढरपूर उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत डगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सुप्रिया यादव पोलीस हेड कॉन्स्टेबल सावंत, कुचेकर टिंगरे, वाघमारे यांनी केली.

पंढरपूर शहर व तालुक्यात कुठेही बालविवाह होत असल्याची माहिती पोलिसांनी द्यावी असे निर्भय पथकाने आव्हान केले आहे. सोलापूर जिल्ह्यामध्ये सर्वात जास्त बालविवाह होत असल्याची माहिती स्पष्ट झाली आहे. त्यामुळे पोलिसांनी बालविवाहासाठी करडी नजर ठेवल्याचे दिसून येत आहे.

# कळंब शहरातील वाढती गुंडगिरी रोखण्यासाठी ठोस उपयोजना करा; अखिल भारतीय छावा संघटनेची मागणी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : कळंब शहरांमध्ये अलीकडील काळात सार्वजनिक ठिकाणी भांडण तंटे करून दहशत निर्माण करण्याचे प्रकार वाढले आहेत शाळा, महाविद्यालय, बस स्टॅन्ड व शहरातील चौकाच्या ठिकाणी अशा प्रकारचे प्रकार वाढत आहेत त्यामुळे शहरातील नागरीक भयभीत झाले असल्याने शहरातील वाढती गुन्हेगारी तात्काळ रोखावी अशी मागणी अखिल भारतीय छावा संघटनेच्या वतीने कळंब पोलीस ठाण्याचे पो.नि.मा.अजित चिंतले यांना निवेदन देऊन मागणी करण्यात आली आहे. दिलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की, आपण नियमित गस्त घालून शहरातील कायदा व सुव्यवस्था राखण्यात यावी.

त्याबरोबर वर्दळीच्या ठिकाणी चुकीच्या पद्धतीने वाहने लावणे, मोठ्या आवाजात सायलन्ससर दुचाकी गाड्या भरधाव वेगाने चालविणांऱ्यावर कार्यवाही करावी, अवैध धंदे आणि बेशिस्त पार्किंग करण यामुळे वादावादीचे प्रकार घडत असून याचे पर्याय मोठ्या भांडणात होत आहेत. त्यामुळे प्रत्यक्ष वाहतुकीला अडथळा निर्माण होऊन रहदारीच्या रस्त्यावर अनावश्यक गर्दीचे प्रमाण वाढत आहे. परिणामी शहराचे सामाजिक आरोग्य बिघडत आहे. यासाठी सार्वजनिक ठिकाणी सीसीटीव्ही तपासणी व देखरेख वाढवून शहरातील सुव्यवस्था सुरळीत ठेवावी.

तसेच शहरांमध्ये कायद्याची अंमलबजावणी करावी, आगामी काळात राष्ट्र नेत्यांच्या व महामानवांच्या जयंती सोहळ्याचे कार्यक्रम घेण्यात येणार आहेत.त्यामुळे अशा कालावधीत काही अनुचित प्रकार घडू नये याबाबत दक्षता म्हणून सदर निवेदन आपणास देण्यात येत आहे. या निवेदनावर योग्य ती कार्यवाही न झाल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे.

या निवेदनावर अखिल भारतीय छावा संघटनेचे कळंब शहराध्यक्ष अमर भैया गायकवाड, अमोल कसबे, अण्णा हौसलमल, मंगेश सुकाळे, कृष्णा चाटे, यांच्या सह संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

## संशोधन क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी

# स्वेरीच्या विद्यार्थ्यांची गरुडझेप: पारस जाधवकडून ९ पेटंट्स प्रकाशित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस)च्या इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग या विभागातील तृतीय वर्षात शिक्षण घेत असलेल्या पारस प्रकाश जाधव व प्रा. आशुतोष अनिलराव गरड यांनी संशोधन व नवोपक्रम क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत सप्टेंबर २०२५ ते मार्च २०२६ या सात महिन्यांच्या कालावधीत एकूण नऊ पेटंट्स प्रकाशित केली आहेत. आदरयुक्त शिस्त, नाईट स्टडी, वैयक्तिक मार्गदर्शन आणि समाजोपयोगी नवकल्पना या बाबींच्या समन्वयातून महाविद्यालयाच्या यशात आणखी भर पडली आहे त्यामुळे त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.




पारस जाधव यांनी विकसित केलेल्या पेटंट्समध्ये सोलर पॅनल क्लिनिंग सिस्टम, ड्रोन डॉक, सॉइल मॉइश्चर सेन्सर संरक्षण, इलेक्ट्रिकल फॉल्ट डिटेक्शन ग्लोव्ह, कृषी पंपासाठी लिफ्टिंग स्टँड, सॉइल न्यूट्रिएंट ॲनालिसिस, स्मार्ट लिक्विड सिस्टम, मल्टी-सेंसर आधारित चॉपिंग बोर्ड तसेच वॉटर टँक क्लिनिंग डिव्हाइस यांसारख्या नाविन्यपूर्ण संकल्पनांचा समावेश आहे. ही सर्व पेटंट्स केवळ तांत्रिक नवकल्पना नसून शेतकरी व समाजासाठी अत्यंत उपयुक्त ठरणारी आहेत. कृषी क्षेत्रातील उपकरणांमुळे शेतकऱ्यांचे श्रम कमी होऊन उत्पादनक्षमता वाढण्यास मदत होणार आहे. सॉइल न्यूट्रिएंट ॲनालिसिस व सॉइल सेन्सर तंत्रज्ञानामुळे मातीचे अचूक परीक्षण होऊन शेती अधिक वैज्ञानिक पद्धतीने करता येणार आहे. सोलर पॅनल क्लिनिंग व वॉटर टँक क्लिनिंग डिव्हाइससारख्या प्रकल्पांमुळे ऊर्जा व पाण्याच्या व्यवस्थापनात सुधारणा होऊन स्वच्छता व कार्यक्षमता वाढणार आहे. इलेक्ट्रिकल फॉल्ट डिटेक्शन ग्लोव्ह व हायजेनिक चॉपिंग बोर्ड यांसारख्या संकल्पनांमुळे सुरक्षितता व आरोग्याच्या दृष्टीनेही समाजाला मोठा फायदा होणार आहे. या यशाबद्दल बोलताना पारस जाधव यांनी आवर्जून नमूद केले की, डॉ.रोंगे सरांनी घालून दिलेली शिस्त, स्वेरी मधील संशोधानाचे वातावरण, नाईट स्टडी मध्ये राखलेले सातत्यपूर्ण परिश्रम यामुळेच संशोधन क्षेत्रातील हे यश शक्य झाले आहे. त्याचबरोबर नियमितपणे घेतले जाणारे प्रशिक्षण व अधिक अभ्यासक्रमासाठी क्लासेस यांचाही यशात मोठा वाटा असल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले. पारस जाधव यांना पेटंट करीता स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी. पी.रोंगे, उपप्राचार्या डॉ.मिनाक्षी पवार, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंगचे विभागप्रमुख डॉ. एन. ए. तळवळकर व प्रा. आशुतोष गरड यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले. स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरींगच्या विद्यार्थ्यांमध्ये संशोधन व नवोपक्रमाला प्रोत्साहन देण्याची परंपरा असून पारस जाधव यांची ही कामगिरी त्या परंपरेचा उत्कृष्ट नमुना मानली जात आहे. त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य बी.पी.रोंगे, अध्यक्ष अशोक भोसले, उपाध्यक्ष सुरेश राऊत, सचिव डॉ. सुरज रोंगे, संस्थेचे इतर पदाधिकारी व विश्वस्त, सर्व संचालक मंडळ, स्वेरी कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार, बी.फार्मसीचे प्राचार्य डॉ. एम. जी. मणियार, डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्यडॉ.एन.डी.मिसाळ, डी.फार्मसीचे प्राचार्य प्रा. एस. व्ही. मांडवे, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, इतर अधिष्ठाता, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांनी पारस जाधव व प्रा. आशुतोष गरड यांचे अभिनंदन केले आहे.

# पारा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित १८ तास अखंड वाचन स्पर्धा उत्साहात पार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पारा प्रतिनिधी/प्रेम शिनगारे : धाराशिव, वाशी तालुक्यातील पारा येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित १८ तास अखंड वाचन स्पर्धा उत्साहात व यशस्वीरीत्या संपन्न झाली. सकाळी नेमक्या ६ वाजता सुरू झालेल्या या ज्ञानयज्ञात विद्यार्थी व नागरिकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवला, अखंड १८ तास चाललेल्या या वाचन उपक्रमात लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांनी एकाग्रतेने वाचन करत ज्ञानाची आवड जपली. संपूर्ण कालावधीत सहभागींचा उत्साह टिकून राहिल्याने परिसरात प्रेरणादायी व ज्ञानमय वातावरण निर्माण झाले होते.

या स्पर्धेचे आयोजन भीम जनमोस्तव समितीच्या वतीने करण्यात आले होते, तर भीम नगरमधील तरुण पिढीचे मोलाचे सहकार्य लाभले. त्यांच्या नियोजनबद्ध प्रयत्नांमुळे हा उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

या उपक्रमातून वाचन संस्कृतीला चालना मिळण्यासोबतच तरुण पिढीमध्ये ज्ञानाची आवड निर्माण करण्याचा महत्त्वपूर्ण संदेश देण्यात आला. समाजामध्ये सकारात्मक विचार, बौद्धिक विकास आणि जागरूकता वाढवण्याच्या दृष्टीने हा उपक्रम प्रेरणादायी ठरला.या यशस्वी उपक्रमामुळे भविष्यातही अशाच ज्ञानवर्धक आणि समाजप्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्याची प्रेरणा मिळाली असून, उपस्थितांनीही अशा उपक्रमांना पुढेही मोठ्या प्रमाणात पाठिंबा देण्याची भावना व्यक्त केली.

# सोलापूर जिल्ह्यात अनधिकृत पुतळे, स्मारके व ध्वजस्तंभ उभारणीवर कडक कारवाई

## जिल्हाधिकाऱ्यांकडून परिपत्रक जारी; शासन नियमांचे पालन न करणाऱ्यांविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय, सोलापूर यांनी परिपत्रक जारी करून सार्वजनिक ठिकाणी पुतळे, स्मारके व ध्वजस्तंभ उभारणीसंदर्भात शासन नियमांचे पालन करण्याचे आदेश दिले आहेत. अनधिकृत उभारणीवर तात्काळ कारवाई करून कायदा व सुव्यवस्था राखण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.



■ नव्याने पुतळा उभारण्यासाठी आवश्यक बाबी

शासन निर्णयानुसार पुतळा उभारणीसाठी खालील कागदपत्रे व परवानग्या अनिवार्य आहेत:

नियमानुसार अर्ज

जागेच्या मालकी हक्काचे प्रमाणपत्र / ना हरकत प्रमाणपत्र (NOC)

ग्रामपंचायत/नगरपरिषद ठराव व मुख्य कार्यकारी अधिकारी/मुख्याधिकारी यांचा अभिप्राय

पोलीस विभागाचा अहवाल (कायदा व सुव्यवस्था बाबत)

सार्वजनिक बांधकाम विभाग अथवा संबंधित प्राधिकरणाची परवानगी

पुतळ्याचा आराखडा, मोजमाप व कला संचानालयाचे प्रमाणपत्र

देखभाल जबाबदारीचा स्थानिक प्राधिकरणासोबतचा लेखी करार

जिल्हास्तरीय पुतळा समितीची अंतिम मंजुरी

ग्रामसभा घेऊन स्थानिक नागरिकांचा अहवाल

■ पोलीस पाटील, ग्रामपंचायत अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी यांची जबाबदारी

अनधिकृत पुतळा उभारणीची माहिती तात्काळ वरिष्ठांना लेखी स्वरूपात देणे बंधनकारक.

माहिती न दिल्यास पोलीस पाटील यांच्यावर महाराष्ट्र ग्राम पोलीस अधिनियम १९६७ नुसार बडतर्फीची कारवाई.

ग्रामपंचायत अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी यांच्यावर प्रशासकीय कारवाई गटविकास अधिकारी व तहसिलदार करतील.

■ ग्रामपंचायत अधिनियम १९५९ मधील कलम ३९ नुसार कार्यवाही

अनधिकृत पुतळा उभारणीची पूर्वकल्पना न दिल्यास संबंधित ग्रामपंचायत सदस्यांविरुद्ध अपात्रतेचा प्रस्ताव गटविकास अधिकारी यांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे सादर करावा.

■ अनधिकृत पुतळा काढण्याबाबत मार्गदर्शक सूचना

१. माहिती मिळताच उपविभागीय अधिकारी, पोलीस अधिकारी, तहसिलदार व गटविकास अधिकारी यांनी एका तासात संयुक्त भेट देऊन चार तासांत पुतळा हटवावा.

२. जागेच्या मालकीची निश्चिती न करता कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी तात्काळ कारवाई करावी.

३. पुतळा बसविणाऱ्यांची माहिती मिळविण्यासाठी व्हिडीओग्राफी व ड्रोनद्वारे निगराणी करावी; २४ तासांत गुन्हा दाखल करावा.

४. पोलीस, महसूल व ग्राम विकास विभागांनी संयुक्त बैठक घेऊन हटविण्याची रूपरेषा ठरवावी.

५. अनधिकृत पुतळे निर्मिती कारखान्यांवर गुन्हे दाखल करून बंद करण्याची कार्यवाही करावी; कारखानदारांकडून जिल्हाधिकारी परवानगीशिवाय पुतळा न सुपूर्त करण्याचे बंधपत्र घ्यावे.

६. हटविलेला पुतळा जवळच्या शासकीय गोदामात सुरक्षित ठेवावा.

७. गावांमध्ये पूर्वकल्पना मिळाल्यास संयुक्त बैठक घेऊन नागरिकांना अनधिकृत उभारणीपासून परावृत्त करावे; विरोध करणाऱ्यांविरुद्ध कारावास व दंडात्मक कारवाई होऊ शकते.

८. उपविभागीय अधिकारी व पोलीस अधिकारी यांनी दरमहा १० तारखेपूर्वी कार्यवाहीचा अहवाल जिल्हादंडाधिकारी व पोलीस अधीक्षकांना सादर करावा.

जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी व मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी स्वाक्षरी केलेल्या या परिपत्रकानुसार अनधिकृत पुतळे, स्मारके व ध्वजस्तंभ उभारणीवर कठोर कारवाई होणार आहे. शासन नियमांचे पालन न करणाऱ्यांविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई होईल, असा इशारा देण्यात आला आहे.

# भालके व सावंत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश करणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : भगीरथ भालके, अनिल सावंत यांनी शासकीय विश्राम पंढरपूर येथील पत्रकार परिषद तीर्थक्षेत्र विकास आघाडीचे व पंढरपूर मंगळवेढा तालुक्यातील ठाणे स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत विजय उमेदवार तसेच बाकी व सावंत प्रेमी बहुसंख्य कार्यकर्ते मोठ्या संख्येने शिवसेना शिंदे गटात प्रवेश निश्चित केला असून रविवारी दिनांक १२ एप्रिल रोजी दुपारी दोन वाजता टिळक स्मारक पंढरपूर येथे हा पक्ष प्रवेशाचा सोहळा पार पडणार आहे अशी माहिती पत्रकार परिषदेत प्रमुख पदाधिकारी व भगीरथ भालके, अनिल सावंत यांनी दिली पंढरपूर शहराच्या सर्वांगीण विकास कामांना गती देण्यासाठी आणि जास्तीत जास्त निधी खेचून आणण्यासाठी आणि सर्वांनी शिवसेनेची उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे. मी स्वतःसाठी



कोणतीही पद मागितली नाही. नगरपालिका निवडणुकीत शहरातील जनतेने विकासासाठी नगराध्यक्ष म्हणून डॉ. सौ प्रणिता यांना निवडून दिले आहे. परंतु विरोधक विकास कामांना

**पंढरपूर टिळक स्मारक येथे रविवारी १२ एप्रिल रोजी पक्षप्रवेश निश्चित**

अडचणी निर्माण करीत आहे, सत्ताधारी गटाची राजकारणी नव्याने आलेले योजनांना हरकती करत आहेत, तसेच यापुढे दडपशाही सहन करणार नाही. राजकीय वर्तुळात उलट सुलट चर्चा सुरू आहे या अफवावर जनतेने विश्वास ठेवणे तीर्थक्षेत्र विकास आघाडी मजबूत आहे. आमच्या मध्ये कोणत्याही प्रकारचा मतभेद नाही व सामाजिक कार्यात राजकारण काही चुकीची घटना वक्तव्य पडतात त्याबाबत विचार करून सामंजस्याने तोडायला काढला आहे सर्वसामान्याच्या विकासासाठी लोकांच्या सेवेसाठी समर्पित राहून काम करण्याची आमची विचारधारा आहे. म्हणूनच आम्ही अनाथांचा नाद व राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे. असे पत्रकारांना विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना भगीरथ भालके व त्यांचे समर्थक तसेच नुकतेच राष्ट्रवादीतून परतलेले अनिल सावंत व त्यांची कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पारा येथील महसूल समाधान शिबिरास नागरिकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वाशी/प्रतिनिधी :राज्य शासनाच्या वतीने सुरू असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर (टप्पा -२) अंतर्गत वाशी तालुक्यातील मौजे पारा येथील रिध्देश लॉन्स मंगल कार्यालयामध्ये शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरामध्ये सर्व विभागाचे स्टॉल लावण्यात आले होते. त्याच बरोबर शिबिरात निराधार वयोवृद्ध नागरिकांची आरोग्य तपासणी ची देखील व्यवस्था करण्यात आली होती. या शिबिरात नागरिकांकडून महसूल विभागाशी संबंधित बऱ्याच प्रकारचे अर्ज मोठ्या प्रमाणात प्राप्त झाले. त्यामध्ये सातबारा उतारा, उत्पन्नाचा दाखला, रहिवासी प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र, राष्ट्रीयत्वाचा दाखला, अल्पभूधारक दाखला, शिधापत्रिका विभक्त करणे, शेतकरी असल्याबाबतचे प्रमाणपत्र अशा विविध सेवेसाठी अर्ज प्राप्त झाले. शिबिरातील मिळालेल्या माहितीनुसार डिजिटल सातबारा उतारा २३८ अर्ज प्राप्त झाले होते. या शिबिरात लाभार्थ्यांना तत्काळ सातबारा आठ अ उतारा वितरित



करण्यात आला. तर काही गावातील श्रावणबाळ निवृत्तीवेतन योजना व इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तीवेतन योजना २५ लाभार्थ्यांचे अर्ज तात्काळ मंजूर करण्यात आले. तर मौजे.मंडवा येथील आत्महत्याग्रस्त कुटुंबाच्या वारसांना आर्थिक मदतीचा धनादेश वाटप करण्यात आला. उत्पन्नाच्या प्रमाणपत्रासाठी २४ अर्ज प्राप्त झाले असता पाच अर्जावर तत्काळ कारवाई करण्यात आली. याशिवाय जात प्रमाणपत्र,शेतकरी असल्याबाबतचे प्रमाणपत्र,या पुर्वी नागरीकांनी

**शिबिरात लाभार्थ्यांचे अनेक प्रश्न लागली मार्गी**

दाखल केलेल्या अर्जावर तात्काळ कार्यवाही करत सदरील अर्ज निकाली काढण्यात आले. शिबीरात सिंगल विंडो किल्ररन्स अंतर्गत ई पीक पाहणी, सातबारा दुरुस्ती, प्रलंबित अनुदान ई- केवायसी, अग्रीस्टाक, इतर २२अर्ज निकाली काढण्यात आले. या शिबिरामुळे ग्रामस्थांना महसूल विभागाच्या सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध झाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले. अनेक प्रलंबित प्रकरणावर तत्काळ कार्यवाही झाल्यानें ग्राम स्थांचा प्रतिसाद उत्स्फूर्त होता. यावेळी तहसीलदार प्रकाश म्हेत्रे, नायब तहसीलदार पूजा पाटील, डी.जी.शिंदे गटविकास अधिकारी, ओमकार गायकवाड, तालुका कृषी अधिकारी बर्वे, पंचायत समिती सभापती सौ. प्रणिता गायकवाड, उपसभापती नितीन रणदिवे, पारा सज्जाचे ग्राम महसूल अधिकारी प्रकाश गोळे व मंडळातील सर्व ग्राम महसूल अधिकारी मंडळ अधिकारी व इतर विभागाचे सर्व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**घोरपडे, यादव, धिवार, कांबळे, जगताप, सोनवणे, वाघमारे हे ठरले प्रथम पुरस्काराचे मानकरी**

# सासवड येथे महापुरुषांच्या संयुक्त जयंती सोहळ्या निमित्त विविध मान्यवरांना पुरस्कार जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर प्रतिनिधी/डॉ. विनायक गायकवाड : विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती सोहळ्याचे औचित्य साधून, पुरंदर तालुका बहुजन महापुरुष संयुक्त जयंती महोत्सव समितीच्या वतीने सासवड येथे, डॉ बाबासाहेब आंबेडकर उद्यानात, तथागत भगवान गौतम बुद्ध, छत्रपती शिवाजी महाराज, क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज डॉ बाबासाहेब आंबेडकर यांसह विविध महापुरुषांच्या संयुक्त जयंती सोहळ्याचे आयोजन मंगळवार दि. १४ एप्रिल २०२६ रोजी करण्यात आले आहे.

या जयंती महोत्सव सोहळ्यात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना डॉ बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार देऊन सन्मानित करण्याचा निर्णय जयंती महोत्सव समितीच्या वतीने घेण्यात आला आहे. त्या अनुषंगाने, सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारे माहूर गावचे रहिवासी आदर्श शिक्षक आनंदराव घोरपडे




गुरुजी, यांना डॉ बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार, काळदरी येथील माजी तहसिलदार सी. एम. यादव, यांना डॉ बाबासाहेब आंबेडकर आदर्श प्रशासकीय सेवा पुरस्कार, हरगुडे गावचे शैलेश धिवार यांना डॉ बाबासाहेब आंबेडकर आदर्श पोलीस अधिकारी प्रशासकीय सेवा पुरस्कार, पिंपळे गावचे विजय कांबळे यांना डॉ बाबासाहेब आंबेडकर आदर्श बँक अधिकारी प्रशासकीय सेवा पुरस्कार, सुपे खुर्द येथील उद्योजक अविनाश जगताप यांना डॉ बाबासाहेब आंबेडकर उद्योगरत्न पुरस्कार, सोनोरी येथील भाऊसाहेब सोनवणे यांना डॉ बाबासाहेब आंबेडकर उद्योगरत्न पुरस्कार व सिंगापूर येथील आबासाहेब वाघमारे यांना डॉ बाबासाहेब आंबेडकर उद्योगरत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे.

या कार्यक्रमास पुरंदर हवेलीचे आजी माजी आमदार, सासवड नगरपालिकेच्या नगराध्यक्षा आनंदीकाकी जगताप, पुरंदर पंचायत समितीचे सभापती अमित झेंडे, उपसभापती पंचायत समितीचे सदस्यगण जिल्हा परिषद सदस्यगण, सासवड नगरपालिका उपनगराध्यक्ष, व सर्व नगरसेवक विविध राजकीय पक्षाचे नेते अध्यक्ष सामाजिक संघटनेचे नेते पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

सदर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान जयंती महोत्सव समितीचे विश्वस्त अँड सुनिलतात्या धिवार हे भुषविणार असून स्वागताध्यक्षपदी सासवड नगरपालिकेचे नगरसेवक सोपान रणपिसे हे राहणार असून, चलो बुध्दं की ओर ही संकल्पना घेऊन तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या धम्मांचा प्रचार आणि प्रसार करणारे, धम्मंपूत्र प्रबुद्ध साठे यांचे व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक जयंती महोत्सव समितीचे विश्वस्त विष्णूदादा भोसले हे करणार आहेत तर सुत्रसंचालन कैलास धिवा, सुनिल जगताप, डॉ विनायक गायकवाड हे करणार आहेत. धार्मिक विधी भारतीय बौध्द महासभेचे माजी अध्यक्ष बाळासाहेब पोळ यांच्या अध्यक्षतेखाली, भारतीय बौध्दमहासभा करणार आहेत तर आभार, शशीभाऊ गायकवाड राहुल गायकवाड, अनिल कांबळे, अशोक गायकवाड हे करणार असून, सदर कार्यक्रम तीन सत्रात होणार असून, सकाळी १० वाजता महापुरुषांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण, ध्वजारोहण वंदना सकाळी ११ ते १ प्रबोधन सभा, दुपारी १ ते २ भोजन व दुपारी २ ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत चेतना आर्टस प्रेझेन्टस चंद्रकांत चव्हाण यांचा जल्लोष भिमगितांचा या बहारदार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, तरी कार्यक्रमास सर्व शीव शाहू फुले आंबेडकर विचार धारेवर काम करणाऱ्या सर्व मान्यवरांनी भिमसैनिकांनी विविध राजकीय व सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या मान्यंवरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन पुरंदर तालुका बहुजन महापुरुष संयुक्त जयंती महोत्सव समितीचे विश्वस्त बळीराम सोनवणे अमोल जगताप, सुधीर शेलार योगेश घोरपडेसर, कालीदास उबाळे, सचिन कांबळे स्वप्नील पाटोळे सुहास बेंगाळे अतुल भोसले श्रीधर गायकवाड, यांनी केले आहे.

# नांदुर्डीत टांग्याखाली चिरडून वृद्धाचा मृत्यू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड तालुक्यातील नांदुर्डी येथे हरीभुषा बाबा यात्रेनिमित्त भरविण्यात आलेल्या बेकायदेशीर टांगा शर्यतीदरम्यान झालेल्या अपघातात एका ८८ वर्षीय वृद्धाचा मृत्यू झाल्याची घटना घडली असून, या



**सात टांगा शौकिनांविरोधात गुन्हा दाखल**

प्रकरणी सात टांगा शौकिनांविरोधात निफाड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत निफाड पोलीस ठाण्यात पोलीस कर्मचारी धनंजय प्रल्हाद जाधव यांनी फिर्याद दिली आहे. दि.६ एप्रिल २०२६ रोजी दुपारी सुमारे ३ ते ४.३० वाजेच्या दरम्यान नांदुर्डी गावातील कुंदेवाडी ते नांदुर्डी आतील शिव रस्त्यावर हरीभुषा बाबा यात्रेनिमित्त टांगा शर्यत भरविण्यात आली होती. या शर्यतीसंदर्भात पूर्वपरवानगी घेण्यात आलेली नव्हती तसेच यापूर्वी प्रशासनाने शर्यत न भरविण्याबाबत नोटीसही दिली होती. तरीदेखील आरोपींनी कोणत्याही प्रकारच्यासुरक्षिततेच्या उपाययोजना न करता निष्काळजीपणे घोडा व बैलांच्या टांग्यांची शर्यत आयोजित केली. शर्यतीदरम्यान पंचकेश्वर येथील रघुनाथ विठ्ठल शिंदे या ८८ वर्षीय वृद्धाचा टांग्याखाली येऊन मृत्यू झाला. संबंधित प्रकाराची पोलिसांना माहिती न देता मुक्याप्राण्यांना निर्दयतेने वागणूक दिल्याचाही आरोप आहे. या प्रकरणी सुभाष बबन खापरे, राहुल भगवान खापरे, संजय कारभारी आहेर, मधुकर त्र्यंबक कुभार्डे, तानाजी मुरलीधर खापरे, किशोर कैलास निकम व सोपान निवृत्ती देवकर (सर्व रा. नांदुर्डी, ता. निफाड या सात आरोपींच्या विरोधात निफाड पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम १०६(१), २२३, २३९, ३(५) तसेच प्राणी छळ प्रतिबंध अधिनियम १९६० अंतर्गत कलम ११(१) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पोलिस निरीक्षक गणेश गुरव यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार कपालेश्वर ढिकले अधिक तपास करीत आहेत.